भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५

**(सन १९८५ चा अधिनियम क्रमांक १३)**

[दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान]

# The Administrative Tribunals Act, 1985

**(Act No. 13 of 1985)**

**[ As in force on the 21st April, 2003]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ७ ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान असलेला दि ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रायब्यूनल्स अक्ट, १९८५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक ३, दिनांक २ ऑक्टोबर, २००३ यात पृष्ठ २०१ ते २१८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता. आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : २ ऑक्टोबर, २००३.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Administrative Tribunals Act, 1985 as on the 21st April 2003 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part-XII, Section-1, No. 3, Volume 12, dated 2nd October 2003 on pages 201 to 218.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated : 2nd October, 2003.

DR. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५

## कलमांचा क्रम

### प्रकरण एक
### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. विवक्षित व्यक्तींना अधिनियम लागू नसणे.
३. व्याख्या.

### प्रकरण दोन
### न्यायाधिकरणाची व त्याच्या न्यायपीठांची स्थापना

४. प्रशासकीय न्यायाधिकरणांची स्थापना.
५. न्यायाधिकरणाची व त्यांच्या न्यायपीठांची घडण.
६. अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांच्या नियुक्तीसाठी अर्हता.
७. विवक्षित परिस्थितीत उपाध्यक्षाने, अध्यक्ष म्हणून काम पाहणे किंवा अध्यक्षाची कामे पार पाडणे.
८. पदावधी.
९. राजीनामा व बडतर्फी.
१०. अध्यक्ष उपाध्यक्ष व इतर सदस्य यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती.
११. अध्यक्ष म्हणून असण्याचे संपुष्टात आल्यानंतर अध्यक्ष, इत्यादींनी पदे धारण करण्याबाबतची तरतूद.
१२. अध्यक्षांचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार.
१३. न्यायाधिकरणाचा कर्मचारीवर्ग.

### प्रकरण तीन
### न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार

१४. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार.
१५. राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार.
१६. संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार.
१७. अवमानाबद्दल शिक्षा करण्याचे अधिकार.
१८. न्यायपीठामध्ये कामकाजाची वाटणी.

### प्रकरण चार
### कार्यपद्धती

१९. न्यायाधिकरणाकडे अर्ज.
२०. इतर उपाययोजना करून झाल्यावरच अर्ज दाखल करून घेणे.
२१. मर्यादा.
२२. न्यायाधिकरणांची कार्यपद्धती व त्यांचे अधिकार.
२३. सादरकर्ता अधिकारी नियुक्त करण्यासाठी विधिव्यवसायीचे व शासन, इत्यादींचे सहाय्य घेण्याचा अर्जदाराचा अधिकार.
२४. अंतरिम आदेश काढण्यासंबंधीच्या शर्ती.
२५. एका न्यायपीठाकडून दुसऱ्या न्यायपीठाकडे प्रकरणे हस्तांतरित करण्याचा अध्यक्षाचा अधिकार.
२६. बहुमताने निर्णय घेणे.
२७. न्यायाधिकरणाच्या आदेशाचे कार्यान्वयन.

## प्रकरण पाच

### संकीर्ण

कलमे

२८. संविधानाच्या अनुच्छेद १३६ अन्वये सर्वोच्च न्यायालयाव्यतिरिक्त इतर न्यायालयांची अधिकारिता वगळणे.
२९. प्रलंबित प्रकरणांचे हस्तांतरण.
२९क. विवक्षित अपिले दाखल करण्याकरिता उपबंध.
३०. न्यायाधिकरणासमोरील कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असणे.
३१. न्याधिकरणांचे सदस्य व कर्मचारी हे लोकसेवक असणे.
३२. सद्भावपूर्वक केलेल्या कृतींस संरक्षण.
३३. अधिनियमाचा परिणाम अधिभावी असणे.
३४. अडचणी दूर करण्याचा अधिकार.
३५. नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.
३६. समुचित शासनाचा नियम करण्याचा अधिकार.
३६क. भूतलक्षी प्रभावाने नियम करण्याचा अधिकार.
३७. नियम मांडणे.

# प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५

## (१९८५ चा अधिनियम क्रमांक १३)

(२१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान)

[२७ फेब्रुवारी १९८५]

**केंद्राच्या किंवा कोणत्याही राज्याच्या किंवा भारताच्या राज्यक्षेत्रांमध्ये असलेल्या किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या [1][किंवा संविधानाच्या अनुच्छेद ३२३क च्या अनुसार शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कोणत्याही निगमाच्या किंवा सोसायटीच्या] कारभाराशी संबंधित अशा सार्वजनिक सेवांमध्ये व पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींची भरती व सेवाशर्ती यासंबंधातील विवादांचा व फिर्यादींचा प्रशासकीय न्यायाधिकरणांनी न्याय-निर्णय किंवा संपरीक्षा करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, "प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५" असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार,—

(क) जेथवर तो केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाशी संबंधित आहे तेथवर, संपूर्ण भारतभर आहे ;

(ख) जेथवर तो राज्यांच्या प्रशासकीय न्यायाधिकरणांशी संबंधित आहे तेथवर, जम्मू व काश्मीर राज्य वगळता संपूर्ण भारतभर आहे.

(३) या अधिनियमाच्या तरतुदी, जेथवर त्या केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाशी संबंधित आहेत तेथवर, केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[2] अंमलात येतील.

(४) या अधिनियमाच्या तरतुदी, जेथवर त्या राज्यांच्या प्रशासकीय न्यायाधिकरणाशी संबंधित असतील तेथवर, केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[3] राज्यात अंमलात येतील.

२. या अधिनियमाचे तरतुदी पुढील व्यक्तींना लागू होणार नाहीत :— **विवक्षित व्यक्तींना अधिनियम लागू नसणे.**

(क) नौदलाच्या, सेनादलाच्या किंवा वायुदलाच्या किंवा केंद्र सरकारच्या अन्य कोणत्याही सशस्त्र दलाच्या सदस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीला ;

[4][*          *          *          *          *          *          *]

(ग) सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा कोणत्याही उच्च न्यायालयाच्या [5][किंवा त्याला दुय्यम असलेल्या न्यायालयाच्या] कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला ;

(घ) संसदेच्या कोणत्याही एका सभागृहाच्या सचिवालयीन कर्मचारीवर्गावर किंवा कोणत्याही राज्य विधानमंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही एका सभागृहाच्या सचिवालयीन कर्मचारीवर्गावर अथवा विधानमंडळ असणाऱ्या संघ राज्यक्षेत्राच्या बाबतीत त्या विधानमंडळाच्या सचिवालयीन कर्मचारीवर्गावर नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीला.

३. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

[6][(क) "प्रशासनिक सदस्य" याचा अर्थ, खंड (झ) च्या अर्थांतर्गत न्यायिक सदस्य नसेल, असा न्यायाधिकरणाचा कोणताही सदस्य, असा आहे ;]

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. १ जुलै १९८५ : पहा अधिसूचना क्रमांक. जी.एस.आर. ५२७(ई), दिनांक १ जुलै, १९८५.

३. या अधिनियमाच्या तरतुदी ज्या गुजरात, हिमाचलप्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, व ओरिसा यांच्या राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाशी संबंधित आहेत, त्या दिनांक १ जानेवारी, १९८५ पासून अंमलात आल्या आहेत ; पहा अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ९५६(ई), दिनांक ३१ डिसेंबर, १९८५.

४. १९८६ चा अधिनियम १९, कलम ३ द्वारे खंड (ख) वगळण्यात आला (१ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

५. १९८७ चा अधिनियम ५१, कलम २ द्वारे हा मजकूर जादा दाखल केला (२२ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

६. १९८६ चा अधिनियम १९, कलम ४ द्वारे नवीन खंड (क) दाखल केला (२५ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

[१][(कक) "प्रशासकीय न्यायाधिकरण" याचा राज्याच्या संबंधातील अर्थ, त्या राज्यासाठी असलेले प्रशासकीय न्यायाधिकरण, किंवा यथास्थिति ते राज्य व अन्य कोणतेही राज्य किंवा राज्यांसाठी असलेले संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरण, असा आहे;

(ख) "अर्ज" याचा अर्थ, कलम १९ अन्वये केलेला अर्ज, असा आहे;

(ग) "नियत दिवस" याचा न्यायाधिकरणाच्या संबंधातील अर्थ, कलम ४ अन्वये त्या न्यायाधिकरणाची स्थापना अधिसूचनेद्वारे ज्या दिनांकास* झाली असेल तो दिवस, असा आहे;

(घ) "समुचित शासन" याचा अर्थ,—

(एक) केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या किंवा संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या बाबतीत, केंद्र सरकार, असा आहे;

(दोन) राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या बाबतीत राज्य शासन, असा आहे;

(ङ) "न्यायपीठ" याचा अर्थ, न्यायाधिकरणाचे न्यायपीठ, असा आहे;

(च) "केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण" याचा अर्थ, कलम ४, पोटकलम (१) अन्वये स्थापन केलेले प्रशासकीय न्यायाधिकरण, असा आहे;

(छ) "अध्यक्ष" याचा अर्थ, न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, असा आहे;

(ज) "संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरण" याचा अर्थ, दोन किंवा अधिक राज्यांसाठी, कलम ४, पोटकलम (३) अन्वये स्थापन केलेले संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरण, असा आहे;

[२][(झ) "न्यायिक सदस्य" याचा अर्थ, या अधिनियमाखाली तसा सदस्य म्हणून नियुक्त केलेला न्यायाधिकरणाचा सदस्य, असा आहे, आणि कलम ६ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता ज्याच्याकडे आहे अशा अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा त्यात समावेश होतो;

(झक) "सदस्य" याचा अर्थ, न्यायाधिकरणाचा सदस्य (मग तो न्यायिक असो किंवा प्रशासकीय असो), असा आहे आणि त्यात अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा समावेश होतो;]

(ञ) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना, असा आहे;

(ट) "पद" याचा अर्थ, भारतामधील किंवा भारताबाहेरील पद, असा आहे;

(ठ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(ड) "राष्ट्रपती" याचा अर्थ, भारताचे राष्ट्रपती, असा आहे;

[३] * * * * * * *

(ण) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले नियम, असा आहे;

(त) "सेवा" याचा अर्थ, भारतातील किंवा भारताबाहेरील सेवा, असा आहे;

(थ) "सेवा विषयक बाबी" याचा एखाद्या व्यक्तीच्या संबंधातील अर्थ, केंद्राच्या किंवा कोणत्याही राज्याच्या किंवा भारताच्या राज्यक्षेत्रामध्ये असलेल्या किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या किंवा, यथास्थिति, शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाने नियंत्रित केलेल्या कोणत्याही निगमाच्या [४][किंवा सोसायटीच्या] कारभाराशी संबंधित अशा त्या व्यक्तीच्या सेवेच्या शर्तीसंबंधातील पुढील गोष्टीविषयीच्या सर्व बाबी, असा आहे :—

(एक) पारिश्रमिक (भत्यांसह), निवृत्तिवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ,

(दोन) स्थायीकरण, वरिष्ठता, पदोन्नती, पदावनती, मुदतपूर्व सेवानिवृत्ति व नियत सेवावधी यांच्यासह पदावधी,

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम ४ द्वारे खंड (कक) पूर्वी नवीन खंड (क) दाखल केला. मूळ खंड (क) ला (कक) असा नवीन क्रमांक दिला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे (झ) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे खंड (ढ) वगळण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "कोणत्याही निगमाच्या" या शब्दानंतर हे शब्द दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

* १ नोव्हेंबर १९८५ : पहा अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ७६४(ई), दिनांक २८ फेब्रुवारी, १९८५, **भारताचे राजपत्र**, असाधारण भाग-१, खंड ३ (आय).

(तीन) कोणत्याही प्रकारची रजा,

(चार) शिस्तपालनविषयक बाबी, किंवा

(पाच) इतर बाब, मग ती कोणतीही असो,

(द) "गाऱ्हाण्याचे निवारण करण्याविषयीचे सेवानियम" याचा कोणत्याही बाबी संबंधातील अर्थ, त्या बाबींसंबंधातील कोणत्याही गाऱ्हाण्याचे निवारण करण्याबाबतचे या अधिनियमाखालील असतील त्या व्यतिरिक्त अन्यथा असतील असे त्या त्या वेळी अंमलात असलेले नियम, विनियम, आदेश किंवा विलेख किंवा संव्यवस्था, असा आहे.

[1][ (दद) "सोसायटी" याचा अर्थ, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) या अन्वये किंवा त्या त्या काळी राज्यात अंमलात असलेल्या तत्सम कायद्याअन्वये नोंदलेली एखादी सोसायटी, असा आहे] ;

(ध) "सर्वोच्च न्यायालय" याचा अर्थ, भारताचे सर्वोच्च न्यायालय, असा आहे ;

(न) "न्यायाधिकरण" याचा अर्थ, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण किंवा एखादे राज्य प्रशासकीय न्यायाधिकरण किंवा संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरण, असा आहे ;

(प) "उपाध्यक्ष" याचा अर्थ, न्यायाधिकरणाचा उपाध्यक्ष, असा आहे.

**स्पष्टीकरण**—दोन किंवा अधिक उपाध्यक्ष असणाऱ्या न्यायाधिकरणाच्या बाबतीत, या अधिनियमातील उपाध्यक्षाचा निर्देश हा, त्या दोन्ही उपाध्यक्षांच्या बाबतीतील निर्देश आहे, असे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन

### न्यायाधिकरणाची व त्याच्या न्यायपीठांची स्थापना

**प्रशासकीय न्यायाधिकरणांची स्थापना.**

४. (१) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे[2], केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण म्हणून ओळखले जाईल अशा प्रशासकीय न्यायाधिकरणाची, या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमाखाली त्या केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाला प्रदान करण्यात येईल अशा अधिकारितेचा, अधिकारांचा व प्राधिकारांचा वापर करण्याकरिता स्थापना करील.

(२) केंद्र सरकार, कोणत्याही राज्य शासनाकडून त्याबाबतीत विनंती करण्यात आल्यास, अधिसूचनेद्वारे, ........ (राज्याचे नाव) प्रशासकीय न्यायाधिकरण या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका प्रशासकीय न्यायाधिकरणाची, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली त्या राज्याच्या प्रशासकीय न्यायाधिकरणाला प्रदान करण्यात येतील अशा अधिकारितेचा, अधिकारांचा व प्राधिकारांचा वापर करण्याकरता, स्थापना करू शकेल.

(३) कोणतीही दोन किंवा अधिक राज्ये, पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आणि त्या पोटकलमान्वये त्या सर्व राज्यांसाठी किंवा त्यापैकी कोणत्याही राज्यासाठी न्यायाधिकरणे स्थापन केलेली असली तरी, असा करार करू शकतील की, करारात सहभागी होणाऱ्या सर्व राज्यांसाठी एकच प्रशासकीय न्यायाधिकरण राहील आणि या करारास केंद्र सरकारने मान्यता दिली व तो करार भारत सरकारच्या **राजपत्रात** आणि त्यापैकी प्रत्येक राज्याच्या **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाला तर, केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली त्या राज्यासाठी असलेल्या प्रशासकीय न्यायाधिकरणाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारितेचा, अधिकारांचा व प्राधिकारांचा वापर करण्याकरिता एका संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाची स्थापना करू शकेल.

(४) पोटकलम (३) खालील करारामध्ये, संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाचे नाव, संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांची निवड करताना सहभागी राज्यांनी कोणत्या रीतीने एकत्रित व्हायचे ती रीत, न्यायाधिकरणाचे न्यायपीठ किंवा न्यायपीठे जिथे भरतील ती स्थळे, संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या संबंधातील खर्चाची सहभागी राज्यांमध्ये वाटणी या संबंधीच्या तरतुदी अंतर्भूत असतील, तसेच त्यात कराराची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा आणि या अधिनियमाशी विसंगत नसतील अशा इतर पूरक, आनुषंगिक व परिणामस्वरूप तरतुदीही असतील.

[3][ (५) या कलमाच्या किंवा कलम ५ च्या पोटकलम (१) च्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकार,—

(क) कोणत्याही राज्य शासनाच्या सहमतीने, अधिसूचनेद्वारे पोटकलम (२) अन्वये त्या राज्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या न्यायपीठाच्या, किंवा

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम ४ द्वारे (दद) हा खंड नव्याने दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. १ नोव्हेंबर, १९८५ : पहा अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ७६४(ई), दिनांक २८ सप्टेंबर, १९८५.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे पोटकलम (४) नंतर ही पोटकलमे दाखल करण्यात आली (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

न्यायपीठांच्या सर्व किंवा कोणत्याही सदस्याला त्या राज्याच्या बाबतीतील केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या न्यायपीठाचे किंवा न्यायपीठांचे सदस्य म्हणून पदनिर्देशित करू शकेल आणि तो या अधिनियमाद्वारे किंवा अन्वये केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाला प्रदान करण्यात आलेली अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा वापर करू शकेल;

(ख) कोणत्याही राज्य शासनाकडून त्या बाबतीत करण्यात आलेल्या विनंतीवरून त्या राज्यात कार्यरत असलेल्या केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या न्यायपीठाच्या किंवा न्यायपीठांच्या सर्व किंवा कोणत्याही सदस्याला अधिसूचनेद्वारे त्या राज्यासाठीच्या राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या न्यायपीठाचे किंवा न्यायपीठांचे सदस्य म्हणून पदनिर्देशित करू शकेल, आणि तो या अधिनियमाद्वारे किंवा अन्वये त्या राज्यासाठी प्रशासकीय न्यायाधिकरणाला प्रदान करण्यात आलेली अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा वापर करू शकेल ;

आणि अशा पदनिर्देशनानंतर राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाचे न्यायपीठ किंवा न्यायपीठे, किंवा, यथास्थिति, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाचे न्यायपीठ किंवा न्यायपीठे ही सर्व बाबतीत संविधानाच्या अनुच्छेद ३२३ क च्या तरतुदी व या अधिनियमाच्या तरतुदीं या अन्वये स्थापन करण्यात आलेले केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण किंवा त्या राज्यासाठी राज्य प्रशासकीय न्यायाधिकरण असल्याप्रमाणे मानण्यात येईल.

(६) पोटकलम (५) खालील प्रत्येक अधिसूचनेमध्ये, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण व राज्य प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या सामाईक सदस्यांसंबंधातील खर्चाची संबंधित राज्य व केंद्र सरकार यांच्यात वाटणी करण्यासंबंधीचीही तरतूद असेल आणि त्यासाठी आवश्यक व इष्ट वाटतील असे आणि या अधिनियमाशी विसंगत नसतील अशा आनुषंगिक व परिणामस्वरूप तरतुदीही असतील.]

न्यायाधिकरणाची व त्याच्या न्यायपीठांची घडण.

५. (१) प्रत्येक न्यायाधिकरणामध्ये एक अध्यक्ष आणि समुचित शासनास योग्य वाटतील एवढे उपाध्यक्ष [१][आणि न्यायिक व प्रशासकीय सदस्य] असतील आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने त्या न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा वापर त्या न्यायाधिकरणाच्या न्यायपीठाकडून केला जाईल.

[२][ (२) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने न्यायपीठ, एक न्यायिक सदस्य आणि एक प्रशासकीय सदस्य मिळून बनलेले असेल]

[३][ * * * * *]

(४) पोटकलम (१) [४][ * * * *] मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी अध्यक्ष,—

[५][ (क) ज्या न्यायपीठाचा न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य म्हणून त्याची नियुक्ती करण्यात आली असेल त्याची कामे पार पाडण्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायपीठाच्या न्यायिक सदस्याची किंवा, यथास्थिति, प्रशासकीय सदस्यांची कामे पार पाडू शकेल ; ]

(ख) एका न्यायपीठाच्या उपाध्यक्षाची किंवा अन्य सदस्यांची दुसऱ्या न्यायपीठात बदली करू शकेल ;

[६][ (ग) एका न्यायपीठावर नियुक्त करण्यात आलेल्या उपाध्यक्षाला किंवा न्यायिक सदस्याला किंवा प्रशासकीय सदस्याला, अन्य न्यायपीठाच्या उपाध्यक्षाची, किंवा, यथास्थिति, न्यायिक सदस्याची किंवा प्रशासकीय सदस्याची कामेही पार पाडण्याकरिता प्राधिकृत करू शकेल ; आणि]

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे पोटकलम (३) वगळण्यात आले (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

(५) एखादे प्रकरण किंवा काही प्रकरणे, त्यातील प्रश्नांचे स्वरूप लक्षात घेता, त्याच्या मते किंवा केंद्र सरकारने त्या बाबतीत केलेल्या नियमान्वये, [1] [दोन पेक्षा अधिक सदस्यांचा] समावेश असलेल्या न्यायपीठाकडून निर्णित होणे आवश्यक असल्यास तसे करण्याची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास योग्य वाटतील असे सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देऊ शकेल :

[2] [परंतु, या खंडाला अनुसरून, घटित करण्यात आलेल्या प्रत्येक न्यायपीठात कमीत कमी एका न्यायिक सदस्याचा व एका प्रशासकीय सदस्याचा समावेश असेल.]

[3] [ * * * * * ]

(६) या कलमाच्या पूर्ववर्ती तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्ष किंवा अध्यक्षाने याबाबतीत प्राधिकृत केलेला कोणताही अन्य सदस्य, एक-सदस्य [4] [न्यायपीठ] म्हणून काम करण्यास आणि अध्यक्ष सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा प्रकरणाच्या अशा वर्गांबाबत किंवा अशा प्रकरणांच्या वर्गांसंबंधीच्या अशा बाबींबाबत, न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा वापर करण्यास सक्षम असेल :

परंतु, अशा कोणत्याही प्रकरणाचा किंवा बाबींच्या सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यात अध्यक्षाला किंवा अशा सदस्याला जर असे आढळून आले की, त्या प्रकरणाची किंवा त्याबाबींची [5] [दोन सदस्यांचा] समावेश असलेल्या न्यायपीठाकडून सुनावणी होणे आवश्यक आहे, अशा स्वरूपाचे ते प्रकरण किंवा ती बाब आहे, तर ते प्रकरण किंवा ती बाब अध्यक्षाकडून त्यास योग्य वाटेल अशा न्यायपीठाकडे हस्तांतरित केली जाईल, किंवा, यथास्थिति, अध्यक्षाकडे तशी हस्तांतरित करण्यासाठी निर्देशित केली जाईल.

[6] [(७) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाची न्यायपीठे साधारणतः नवी दिल्ली (ज्याला मुख्य न्यायपीठ असे संबोधण्यात येईल), अलाहाबाद, कलकत्ता, मद्रास, नवी मुंबई येथे आणि केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य ठिकाणी भरवण्यात येतील.

(८) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने, मुख्य न्यायपीठ व राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाची अन्य न्यायपीठे साधारणतः ज्या ठिकाणी भरवण्यात येतील ती ठिकाणे, राज्य शासन अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी असतील].

**अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांच्या नियुक्तीसाठी अर्हता.**

६. (१) एखादी व्यक्ती ही,—

(क) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे, किंवा पूर्वी होती; किंवा

(ख) तिने किमान दोन वर्षांकरिता उपाध्यक्षाचे पद धारण केलेले आहे; [7] [* *]

[8] [ * * * * ]

असे असल्याखेरीज, ती व्यक्ती अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र ठरणार नाही.

(२) एखादी व्यक्ती ही,—

[8] [(क) उच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा पूर्वी होती किंवा होण्यास पात्र आहे; किंवा ]

(ख) तिने किमान दोन वर्षांकरिता भारत सरकारचे सचिवाचे पद किंवा भारत सरकारच्या सचिवाच्या वेतनापेक्षा कमी नाही इतक्या वेतनमानातील केंद्र सरकारचे किंवा राज्य शासनाचे अन्य कोणतेही पद, धारण केलेले आहे; किंवा

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम ६ (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे पोटकलम (५) वगळण्यात आले (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले (१ नोव्हेंबर १९८५ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे "तीन सदस्यांचा" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे पोटकलम (७) ऐवजी ही पोटकलमे घालण्यात आली (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

७. १९८७ चा अधिनियम ५१, कलम ३ द्वारे "किंवा" हा शब्द व "खंड (ग)" वगळण्यात आला (२२ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

८. वरील अधिनियमाच्या कलम ३ ऐवजी दाखल करण्यात आले (२२ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[1][ (खख) तिने किमान पाच वर्षांकरिता, भारत सरकारचे अतिरिक्त सचिवाचे पद किंवा भारत सरकारच्या अतिरिक्त सचिवाच्या पदाच्या वेतनापेक्षा कमी नाही इतक्या वेतनमानातील केंद्र सरकारचे किंवा राज्य शासनाचे इतर कोणतेही पद, धारण केलेले आहे; किंवा]

(ग) तिने तीन वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीकरिता [2][न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य] म्हणून पद धारण केलेले आहे,

असे असल्याखेरीज ती व्यक्ती उपाध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र ठरणार नाही.

[3][ (३) एखादी व्यक्ती ही,—

(क) उच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा पूर्वी होती किंवा होण्यास अर्ह आहे; किंवा

(ख) भारतीय न्याय सेवेची सदस्य होती आणि तिने किमान तीन वर्षांकरिता त्या सेवेतील प्रथम श्रेणीचे पद धारण केले आहे,

असे असल्याखेरीज, ती व्यक्ती न्यायिक सदस्य म्हणून नियुक्त होण्यास पात्र ठरणार नाही.

(३क) एखादी व्यक्ती ही,—

(क) तिने किमान दोन वर्षांकरिता, भारत सरकारचे अतिरिक्त सचिवाचे पद किंवा भारत सरकारच्या अतिरिक्त सचिवाच्या पदाच्या वेतनापेक्षा कमी नाही इतक्या वेतनमानातील केंद्र सरकारचे किंवा राज्य शासनाचे इतर कोणतेही पद, धारण केलेले आहे;

(ख) तिने किमान तीन वर्षांकरिता, भारत सरकारचे संयुक्त सचिवाचे पद किंवा भारत सरकारच्या सयुक्त सचिवाच्या वेतनापेक्षा कमी नाही इतक्या वेतनमानातील, केंद्र सरकारचे किंवा राज्य शासनाचे कोणतेही अन्य पद धारण केले आहे,

आणि दोन्ही बाबतीत तिला, समुचित प्रशासकीय अनुभव आहे, असे असल्याखेरीज, ती व्यक्ती प्रशासकीय सदस्य म्हणून नियुक्त होण्यास पात्र असणार नाही].

(४) [4][पोटकलम (७) च्या तरतुदींच्या अधीनतेने केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाची,] उपाध्यक्षाची व प्रत्येक सदस्याची नियुक्ती राष्ट्रपती करील.

(५) [4][पोटकलम (७) च्या तरतुदींच्या अधीनतेने] राज्याच्या प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाची, उपाध्यक्षाची व प्रत्येक सदस्याची नियुक्ती राष्ट्रपती संबंधित राज्याच्या राज्यपालांशी विचार-विनिमय करून करील.

(६) राष्ट्रपती, संबंधित राज्याच्या राज्यपालांशी विचारविनिमय केल्यावर सहभागी राज्य शासनामध्ये झालेल्या कराराच्या कलम ४, पोटकलम (३) अन्वये [5][आणि पोटकलम (७) च्या तरतुदींच्या अधीनतेने] प्रसिद्ध करण्यात आलेल्या अटींना अधीन राहून संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाची, उपाध्यक्षाची व इतर प्रत्येक सदस्याची नियुक्ती करील.

[6][ (७) या कलमान्वये विनिर्दिष्ट केलेली पात्रता असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्ती, भारताच्या मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय केल्याखेरीज करण्यात येणार नाही.

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम ७ द्वारे खंड (ख) नंतर खंड (खख) दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे, मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी ही पोटकलमे दाखल करण्यात आली (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे जे पोटकलम (७) दाखल करण्यात आले होते त्याऐवजी १९८७ चा अधिनियम ५१, कलम ३ द्वारे पोटकलम (७) दाखल करण्यात आले (२२ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखाद्या व्यक्तीने केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणतेही पद किती कालावधीकरिता धारण केले आहे, याची गणना करताना, त्या व्यक्तीने केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील अन्य ज्या पदाचे वेतनमान, प्रथम नमूद केलेल्या पदाच्या वेतनमानाइतकेच असेल किंवा त्यापेक्षा अधिक असेल असे, (या अधिनियमाखालील पदासह) कोणतेही पद जेवढ्या कालावधीकरिता धारण केले असेल तो कालावधी अंतर्भूत केला जाईल.

७. (१) ज्यावेळी अध्यक्षाचे पद, त्याच्या मृत्युमुळे, राजीनाम्यामुळे किंवा अन्य कारणामुळे रिक्त झाले असेल त्यावेळी, उपाध्यक्ष किंवा, यथास्थिति, समुचित शासन, अधिसूचनेद्वारे या संदर्भात प्राधिकृत करील असा, उपाध्यक्षांपैकी एक उपाध्यक्ष, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार असे रिक्त पद भरण्यासाठी नियुक्त करण्यात आलेला नवा अध्यक्ष ते पद ग्रहण करील त्या दिनांकापर्यंत अध्यक्ष म्हणून काम पाहील. **विवक्षित परिस्थितीत उपाध्यक्षाने अध्यक्ष म्हणून काम पाहणे किंवा अध्यक्षाची कामे पार पाडणे.**

(२) जेव्हा अध्यक्ष हा, अनुपस्थितीमुळे, आजारपणामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे आपली कर्तव्ये पार पाडण्यात असमर्थ असेल तेव्हा, उपाध्यक्ष किंवा, यथास्थिति, समुचित शासन अधिसूचनेद्वारे यासंदर्भात प्राधिकृत करील, अशा उपाध्यक्षांपैकी एक उपाध्यक्ष, अध्यक्ष आपल्या कामावर रुजू होईल त्या दिनांकापर्यंत अध्यक्षांची कर्तव्ये पार पाडील.

[1][८. अध्यक्ष, उपाध्यक्ष, किंवा इतर सदस्य त्याचे पद, त्या पदावर तो ज्या दिनांकास प्रविष्ट होईल त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता त्या नात्याने धारण करील; मात्र, तो आणखी पाच वर्षांच्या कालावधीसाठी पुर्ननियुक्तीस पात्र असेल : [1][पदावधी.]

परंतु, अध्यक्षाला, उपाध्यक्षाला किंवा इतर कोणत्याही सदस्याला,—

(क) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्याबाबतीत, वयाची पासष्ट वर्षे पूर्ण केल्यानंतर; आणि

(ख) इतर सदस्यांच्या बाबतीत, वयाची बासष्ट वर्षे पूर्ण केल्यानंतर,

ते पद धारण करता येणार नाही.]

९. (१) अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा इतर सदस्य हे स्वतःच्या स्वाक्षरीने राष्ट्रपतींना उद्देशून लेखी नोटीस पाठवून आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतील : **राजीनामा व बडतर्फी.**

परंतु, अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा इतर सदस्य यांना राष्ट्रपतीने तत्पूर्वी आपले पद सोडून देण्याची परवानगी दिलेली नसेल तर, ते अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी समाप्त होईपर्यंत किंवा त्यांचा उत्तराधिकारी म्हणून रीतसर नियुक्त केलेली व्यक्ती त्याच्या पदावर प्रविष्ट होईपर्यंत किंवा त्यांच्या पदाचा अवधी समाप्त होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत आपली पदे धारण करण्याचे चालू ठेवतील.

(२) अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य कोणतेही सदस्य यांच्याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाने चौकशी केल्यानंतर व त्या चौकशीत त्यांना त्यांच्याविरुद्ध असलेले आरोप कळवण्यात येऊन त्या आरोपाबाबत आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्यांची गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता सिद्ध झाली आहे या कारणावरून राष्ट्रपतीने तसा आदेश दिला असल्याखेरीज अशा अध्यक्षाला, उपाध्यक्षाला किंवा इतर कोणत्याही सदस्याला त्याच्या पदावरून बडतर्फ केले जाणार नाही.

(३) केंद्र सरकार, नियमाद्वारे, पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेली, अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा इतर सदस्य यांची गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता याबाबत अन्वेषण करण्याच्या कार्यपद्धतीचे नियमन करू शकेल.

१०. अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांना देय असणारे वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती (निवृत्तिवेतन, उपदान व इतर सेवानिवृत्ति लाभ यांसह) या केंद्र सरकार विहित करील त्याप्रमाणे असतील : **अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती.**

परंतु, अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा इतर सदस्य यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांचे वेतन व भत्ते किंवा त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती यांच्यात त्याला हानिकारक असा कोणताही बदल करण्यात येणार नाही.

११. पद धारण करण्याचे संपुष्टात आल्यावर,— **अध्यक्ष म्हणून असण्याचे संपुष्टात आल्यानंतर अध्यक्ष, इत्यादींनी पदे धारण करण्याबाबतची तरतूद.**

(क) केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाचा अध्यक्ष हा भारत सरकारच्या नियंत्रणाखाली किंवा एखाद्या राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली पुन्हा नियुक्त होण्यास अपात्र असेल ;

---

१. १९८७ चा अधिनियम ५१, कलम ४ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम नव्याने दाखल करण्यात आले (२२ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(ख) राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाचा किंवा संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाचा अध्यक्ष हा, या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा इतर कोणताही सदस्य म्हणून किंवा इतर कोणत्याही राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाचा किंवा संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती होण्यास पात्र असेल, परंतु, भारत सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील अन्य कोणत्याही सेवेत नियुक्त होण्यास तो पात्र असणार नाही ;

(ग) केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाचा उपाध्यक्ष हा, या अधिनियमाच्या अन्य तरतुदींच्या अधीनतेने, त्या न्यायाधिकरणाचा अध्यक्ष म्हणून किंवा कोणत्याही राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाचा किंवा संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र असेल, परंतु, भारत सरकारच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील अन्य कोणत्याही सेवेत नियुक्त होण्यास पात्र असणार नाही;

(घ) राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाचा किंवा संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाचा उपाध्यक्ष हा, या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने, त्या न्यायाधिकरणाचा अध्यक्ष म्हणून किंवा केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही अन्य राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाचा किंवा संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र असेल, परंतु, भारत सरकारच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील अन्य कोणत्याही सेवेत नियुक्त होण्यास पात्र असणार नाही ;

(ङ) कोणत्याही न्यायाधिकरणाचा (अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांव्यतिरिक्त) एखादा सदस्य हा, या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने त्या न्यायाधिकरणांचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून किंवा इतर कोणत्याही न्यायाधिकरणाचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य म्हणून नियुक्त होण्यास पात्र असेल, परंतु, भारत सरकारच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील अन्य कोणत्याही सेवेत नियुक्त होण्यास पात्र असणार नाही ;

(च) अध्यक्ष, उपाध्यक्ष, किंवा अन्य सदस्य हा, ज्या न्यायाधिकरणाचा तो अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सदस्य असेल त्या न्यायाधिकरणासमोर हजर होणार नाही, कृती करणार नाही किंवा प्रतिकार करणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील नियुक्तीमध्ये, भारताच्या राज्य क्षेत्रातील एखाद्या स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील, किंवा त्या सरकारच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील, निगमाखालील [1][किंवा सोसायटी] खालील नियुक्त्यांचा समावेश आहे.

**अध्यक्षाचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार.** १२. अध्यक्ष, त्याच्याकडे समुचित शासनाने केलेल्या नियमांद्वारे निहित करण्यात येतील अशा, वित्तीय व प्रशासकीय अधिकारांचा [2][ * * * * ] न्यायपीठांच्या संबंधात वापर करील :

परंतु, अध्यक्षाला, त्याला योग्य वाटतील असे त्याचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार [3][उपाध्यक्षाला किंवा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला], [3][उपाध्यक्षाला किंवा अशा अधिकाऱ्याला] अशा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना, अध्यक्षाच्या निदेशनानुसार, नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणाखाली काम करण्याचे चालू ठेवील [3][या शर्तींच्या अधीनतेने] प्रदान करण्याचा प्राधिकार असेल.

**न्यायाधिकरणाचा कर्मचारी वर्ग.** १३. (१) एखाद्या न्यायाधिकरणाला त्याची कामे पार पाडण्याकरिता सहाय्य करण्यासाठी आवश्यक असतील अशा अधिकारीवर्गाचे व इतर कर्मचारीवर्गाचे स्वरूप व प्रवर्ग, समुचित शासन निश्चित करील आणि त्यास योग्य वाटतील असे अधिकारी व इतर कर्मचारी त्या त्या न्यायाधिकरणाला पुरवील.

[4][(१क) न्यायाधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी अध्यक्षाच्या सर्वसाधारण देखरेखीखाली त्यांची कामे पार पाडतील.]

(२) न्यायाधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे व इतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या शर्ती या, समुचित शासनाने तयार केलेल्या नियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम ८ द्वारे हे शब्द जादा दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे हे पोटकलम नव्याने दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण तीन

### न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार

१४. (१) या अधिनियमात अन्यत्र व्यक्तपणे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण नियत दिवशी व तेव्हापासून, सर्व न्यायालयांकडून [१][* * * * *] सर्वोच्च न्यायालय वगळता त्या नियत दिवसापूर्वी वापरण्याजोगी असलेली सर्व अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा पुढील बाबींसंबंधात वापर करील — केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार.

(क) कोणत्याही अखिल भारतीय सेवेत किंवा संघराज्याच्या कोणत्याही नागरी सेवेत किंवा संघराज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही नागरी पदावर किंवा संरक्षणाशी संबंधित अशा पदावर किंवा संरक्षण सेवेत जेव्हा, दोन्ही बाबतीत ते पद नागरी व्यक्तीद्वारे भरण्यात यावयाचे असेल तेव्हा, त्या पदावरील भरती आणि भरतीसंबंधातील अन्य बाबी ;

(ख) (एक) कोणत्याही अखिल भारतीय सेवेतील सदस्य ; किंवा

(दोन) संघराज्याच्या नागरी सेवेत किंवा संघराज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावर नियुक्ती केलेली (अखिल भारतीय सेवेची सदस्य नसलेली किंवा खंड (ग) मध्ये निर्देश नसलेली अशी) व्यक्ती; किंवा

(तीन) कोणत्याही संरक्षण सेवेत किंवा संरक्षणाशी संबंधित अशा पदावर नियुक्ती केलेली (अखिल भारतीय सेवेची सदस्य नसलेली किंवा खंड (ग) मध्ये निर्देश नसलेली अशी) एखादी नागरी व्यक्ती,

यांच्या संबंधातील सर्व सेवाविषयक बाबी,

आणि असा, सदस्य, व्यक्ती किंवा नागरी व्यक्ती यांच्या, संघराज्याच्या किंवा एखाद्या राज्यांच्या किंवा भारताच्या राज्य क्षेत्रामधील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील एखाद्या स्थानिक वा अन्य प्राधिकरणाच्या किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील एखाद्या निगमाच्या [२][किंवा सोसायटीच्या] व्यवहाराशी संबंधित अशा सेवेच्या संबंधातील सर्व सेवाविषयक बाबी;

(ग) उपखंड (दोन) किंवा उपखंड (तीन)च्या मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही सेवेत किंवा पदावर नियुक्ती केलेल्या व जिच्या सेवा राज्य शासनाने किंवा कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाने किंवा कोणत्याही निगमाने [२][किंवा सोसायटीने] किंवा अन्य संस्थेने, केंद्र सरकारकडे अशा नियुक्तीसाठी निहित केल्या आहेत, अशा व्यक्तींच्या संबंधातील संघराज्याच्या व्यवहारांशी संबंधित अशा सेवेबाबतच्या सर्व सेवाविषयक बाबी ;

[३][स्पष्टीकरण.—शंकानिरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, या पोटकलमातील "संघराज्य" याच्या उल्लेखात संघराज्यक्षेत्र या उल्लेखाचाही समावेश आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.]

(२) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून, पोटकलम (३)च्या तरतुदी राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील किंवा मालकीचे स्थानिक किंवा इतर प्राधिकरण किंवा निगम [२][किंवा सोसायटी] नसेल अशा भारताच्या क्षेत्रामधील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील स्थानिक किंवा इतर प्राधिकरणांना आणि शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील निगमांना [४][किंवा सोसायट्यांना] लागू करू शकेल:

परंतु, केंद्र सरकारला, या अधिनियमामध्ये परिकल्पित असलेल्या योजनेचे संक्रमण सुलभ करण्याच्या प्रयोजनार्थ, तसे करणे इष्ट वाटल्यास, स्थानिक किंवा इतर प्राधिकरणे किंवा निगम [४][किंवा सोसायट्या] यांच्या विविध वर्गाबाबत किंवा कोणत्याही वर्गातील विविध संवर्गाबाबत या पोटकलमा अन्वये असे विविध दिनांक विनिर्दिष्ट करता येतील.

(३) या अधिनियमात अन्यथा व्यक्तपणे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण या पोटकलमाच्या तरतुदी ज्या दिनांकापासून कोणत्याही स्थानिक किंवा इतर

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम ११ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले (१ नोव्हेंबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले (२५ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

प्राधिकरणाला किंवा निगमाला [१][किंवा सोसायटीला] लागू होतात त्या दिनांकास व तेव्हापासून, त्या दिनांकाच्या लगतपूर्वी सर्व न्यायालयांकडून [२][ * * *] (सर्वोच्च न्यायालयाव्यतिरिक्त) वापरण्यायोग्य असतील अशा सर्व अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचाही पुढील बाबतीत वापर करील,—

(क) अशा स्थानिक किंवा इतर प्राधिकरणांच्या किंवा निगमाच्या [१][किंवा सोसायटीच्या] व्यवहाराशी संबंधित अशा कोणत्याही सेवेत किंवा पदावर सेवा भरती आणि सेवाभरतीशी संबंधित बाबी ; आणि

(ख) जी व्यक्ती अशा स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाच्या किंवा निगमाच्या [१][किंवा सोसायटीच्या] व्यवहाराशी संबंधित अशा कोणत्याही सेवेत किंवा पदावर नियुक्त करण्यात आली असेल अशा [पोटकलम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त अन्य] व्यक्तीच्या संबंधातील आणि अशा व्यक्तीच्या अशा व्यवहारांच्या संदर्भातील सेवेच्या संबंधातील सर्व सेवाविषयक बाबी.

**राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार.**

१५. (१) या अधिनियमात अन्यथा व्यक्तपणे तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, राज्याचे प्रशासकीय न्यायाधिकरण हे, नियत दिवशी व तेव्हापासून, त्या दिवसाच्या लगतपूर्वी सर्व न्यायालयांकडून ([३]* * * * सर्वोच्च न्यायालय वगळता) पुढील बाबतीत वापरण्यायोग्य असतील अशा सर्व अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा वापर करील :—

(क) राज्याच्या कोणत्याही नागरी सेवेतील किंवा राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही नागरी पदावरील सेवाभरती, आणि सेवाभरतीशी संबंधित बाबी ;

(ख) राज्य शासनाच्या कोणत्याही नागरी सेवेत किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही नागरी पदावर नियुक्त केलेल्या [या पोट-कलमाच्या खंड (ग) मध्ये निर्देशिलेली व्यक्ती नसेल अशा किंवा कलम १४, पोटकलम (१), खंड (ख) मध्ये निर्देशिलेला सदस्य, व्यक्ती किंवा नागरी व्यक्ती नसेल अशा] व्यक्तीच्या संबंधातील आणि राज्याच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही स्थानीक किंवा इतर प्राधिकरणाच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कोणत्याही निगमाच्या [१][किंवा सोसायटीच्या] व्यवहाराशी संबंधित असलेल्या, अशा व्यक्तीच्या सेवेसंबंधातील, सर्व सेवाविषयक बाबी ;

(ग) खंड (ख) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही सेवेत किंवा पदावर नियुक्त केलेल्या व जिच्या सेवा, राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील किंवा त्याच्या मालकीच्या कोणत्याही अशा स्थानिक प्राधिकरणाने किंवा अन्य प्राधिकरणाने किंवा निगमाने [१][किंवा सोसायटीने] किंवा अन्य संस्थेने राज्य शासनाकडे अशा नियुक्तीसाठी निहित केल्या आहेत, अशा व्यक्तीच्या संबंधातील राज्य शासनाच्या व्यवहाराशी संबंधित अशा सेवेबाबतच्या सर्व सेवाविषयक बाबी.

(२) राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून, पोटकलम (३) च्या तरतुदी राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील किंवा त्याच्या मालकीच्या स्थानिक किंवा इतर प्राधिकरणांना व निगमांना [४][किंवा सोसायट्यांना] लागू करु शकेल :

परंतु, राज्य शासनास या अधिनियमामध्ये परिकल्पित असलेल्या योजनेचे संक्रमण सुलभ करण्याच्या प्रयोजनार्थ, तसे करणे इष्ट वाटल्यास, स्थानिक किंवा इतर प्राधिकरणे किंवा निगम [५][किंवा सोसायट्या] यांच्या विविध वर्गाबाबत किंवा कोणत्याही वर्गातील विविध संवर्गाबाबत, या पोट-कलमान्वये असे विविध दिनांक विनिर्दिष्ट करता येतील.

(३) या अधिनियमात, अन्यथा व्यक्तपणे तरतुद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, राज्याचे प्रशासकीय न्यायाधिकरण हे, या पोटकलमाच्या कोणत्याही स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाला किंवा निगमाला [४][किंवा सोसायटीला] ज्या दिनांकापासून लागू होतात, त्या तरतुदी व तेव्हापासून, त्या दिनांकाच्या लगतपूर्वी सर्व न्यायालयाकडून ([३]* * * * सर्वोच्च न्यायालय वगळता) पुढील बाबतीत

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम ११ द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला. (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे "संविधानाच्या अनुच्छेद १३६ खालील" हा मजकूर, वगळण्यात आला (२२ जानेवारी १९८६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

वापरण्यायोग्य असणाऱ्या सर्व अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा पुढील बाबतीत वापर करील.—

(क) अशा स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाच्या किंवा निगमाच्या [१][किंवा सोसायटीच्या] व्यवहारांशी संबंधित अशा कोणत्याही सेवेत किंवा पदावर सेवाभरती, आणि सेवाभरतीशी संबंधित बाबी ; आणि

(ख) स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाच्या किंवा निगमाच्या [१][किंवा सोसायटीच्या] व्यवहारांशी संबंधित अशा कोणत्याही सेवेत किंवा पदावर नियुक्ती केलेल्या (या कलमाच्या पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्देशिलेली व्यक्ती नसेल अशा किंवा कलम १४, पोटकलम (१), खंड (ख) मध्ये उल्लेखलेला सदस्य, व्यक्ती किंवा नागरी व्यक्ती नसेल अशा) व्यक्तीच्या संबंधातील अशा व्यवहारांशी संबंधित अशा त्या व्यक्तीच्या सेवेसंबंधातील सर्व सेवाविषयक बाबी.

(४) शंकानिवारणार्थ, असे घोषित करण्यात येत आहे की, राज्याच्या प्रशासकीय न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार हे, ज्या बाबीसंबंधात, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार लागू होतात किंवा वापरण्याजोगे असतात, त्याबाबीसंबंधात लागू होणार नाहीत किंवा वापरण्याजोगे नसतील.

१६. दोन किंवा अधिक राज्यांसाठी असलेले संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरण, अशा राज्यांसाठी असलेल्या राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाकडून वापरण्यायोग्य असलेली सर्व अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा वापर करील. संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार.

१७. न्यायाधिकरणाला, त्याच्या अवमानाबाबत उच्च न्यायालयाला असते व ते जिचा वापर करते तशीच अधिकारिता, अधिकार व प्राधिकार असतील व ते त्यांचा वापर करील आणि या प्रयोजनार्थ न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ (१९७१ चा ७०) च्या तरतुदी पुढील फेरफारांच्या अधीनतेने अंमलात येतील,— अवमानाबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार.

(क) त्यातील उच्च न्यायालयाच्या निर्देशाचा अर्थ, अशा न्यायाधिकरणाच्या निर्देशाचा समावेश असल्याप्रमाणे लावण्यात येईल ;

(ख) उक्त अधिनियमाच्या कलम १५ मधील, महाअधिवक्ता याचा अर्थ,—

(एक) केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या संदर्भात महान्यायवादी किंवा महान्यायाभिकर्ता किंवा अतिरिक्त महान्यायाभिकर्ता यांचा निर्देश, असा लावण्यात येईल ; आणि

(दोन) राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या किंवा दोन किंवा अधिक राज्यांसाठी असलेल्या संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या संदर्भात त्या राज्याच्या किंवा असे न्यायाधिकरण ज्या राज्यांसाठी स्थापन करण्यात आले असेल, त्यांपैकी कोणत्याही राज्याच्या महाअधिवक्त्याचा निर्देश, असा लावण्यात येईल.

१८. (१) जेव्हा [२][एखाद्या न्यायाधिकरणाची कोणतीही न्यायपीठे घटित करण्यात येतील,] तेव्हा समुचित शासन, वेळोवेळी अधिसूचनेद्वारे न्यायाधिकरणाच्या कामकाजाची [३][ * * * * ] न्यायपीठांमध्ये वाटणी करण्यासंबंधात तरतुदी करू शकेल आणि प्रत्येक न्यायपीठाने कोणते काम पाहायचे ते विनिर्दिष्ट करू शकेल. न्यायपीठांमध्ये कामकाजाची वाटणी.

(२) एखादी बाब, न्यायाधिकरणाच्या विवक्षित न्यायपीठाला नेमून दिलेल्या कामकाजाच्या कक्षेत येते की नाही, असा प्रश्न उद्‌भवल्यास अध्यक्षाचा त्यावरील निर्णय हा अंतिम असेल.

**स्पष्टीकरण.**—शंकानिरसनार्थ, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, "बाबी" या संज्ञेत, कलम १९ खालील अर्जाचा समावेश आहे.

## प्रकरण चार

### कार्यपद्धती

१९. (१) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने न्यायाधिकरणाच्या अधिकारितेतील कोणत्याही बाबीसंबंधातील कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेली एखादी व्यक्ती, तिचे गाऱ्हाणे दूर करण्यासाठी न्यायाधिकरणाकडे अर्ज करू शकेल. न्यायाधिकरणाकडे अर्ज.

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम १२ द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

(शा. म. मु.) एच ४०६५—४ (१०३५—१-२००४)

स्पष्टीकरण.—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ "आदेश" म्हणजे,—

(क) केंद्र सरकारने किंवा भारताच्या राज्यक्षेत्रातील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील एखाद्या स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाने किंवा सरकारच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कोणत्याही निगमाने [1][किंवा सोसायटीने] दिलेला आदेश ; किंवा

(ख) खंड (क) मध्ये निर्देशिलेल्या सरकारच्या किंवा स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाच्या किंवा निगमाच्या [1][किंवा सोसायटीच्या] एखाद्या अधिकाऱ्याने, समितीने किंवा इतर संस्थेने किंवा न्यायाधिकरणाने दिलेला आदेश.

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज हा, केंद्र सरकार विहित करील अशा नमुन्यात असेल व त्यासोबत विहित दस्तऐवज किंवा अन्य पुरावा [2][आणि असा अर्ज दाखल करण्यासंबंधातील (काही फी असल्यास, शंभर रुपयांहून अधिक नाही इतकी) फी आणि आदेशिका बजावण्याची किंवा कार्यान्वित करण्याची अन्य कोणतीही फी] देण्यात येईल.

[3][(३) पोटकलम (१) खालील असा अर्ज मिळाल्यानंतर, न्यायाधिकरणाची त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, जर अशी खात्री झाली की, हा अर्ज अभिनिर्णयाकरिता किंवा संपरीक्षेकरिता योग्य आहे, तर ते न्यायाधिकरण तो अर्ज दाखल करून घेईल; परंतु न्यायाधिकरणाची जेव्हा तशी खात्री होणार नाही तेव्हा ते, असा अर्ज, त्याची कारणे नमूद करून, संक्षेपतः नाकारू शकेल.]

(४) जेव्हा न्यायाधिकरण कलम १९ अनुसार एखादा अर्ज दाखल करून घेईल तेव्हा, अशा अर्जातील विषयवस्तुबाबतच्या गाऱ्हाण्याचे निवारण करण्याविषयीच्या संबद्ध सेवानियमांन्वये केली जाणारी व असा अर्ज दाखल करण्याच्या लगतपूर्वी प्रलंबित असणारी प्रत्येक कार्यवाही समाप्त होईल आणि न्यायाधिकरणाने अन्यथा निदेश दिला असेल ते खेरीज करून, अशा नियमानुसार त्यानंतर अशा विषयाबाबतचे कोणतेही अपील किंवा प्रतिवेदन विचारात घेतले जाणार नाही.

**इतर उपाययोजना करून झाल्यावरच अर्ज दाखल करून घेणे.**

२०. (१) अर्जदाराने आपले गाऱ्हाणे दूर करण्याकरिता संबद्ध सेवानियमांनुसार त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व उपाययोजना केलेल्या आहेत, याबाबत न्यायाधिकरणाची खात्री पटल्याशिवाय न्यायाधिकरण असा अर्ज साधारणतः दाखल करून घेणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ, एखाद्या व्यक्तीने, गाऱ्हाणी दूर करण्याकरिता, संबंधित सेवानियमांन्वये त्याला उपलब्ध असलेल्या सर्व उपाययोजनांचा वापर करून बघितला आहे, असे पुढील बाबतीत समजण्यात येईल,—

(क) अशा व्यक्तीने गाऱ्हाण्यांच्या बाबतीत दाखल केलेले कोणतेही अपील किंवा केलेले कोणतेही प्रतिवेदन नाकारणारा अंतिम आदेश, शासनाने किंवा अशा नियमांन्वये असा आदेश संमत करण्यास सक्षम अशा अन्य प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने किंवा अन्य व्यक्तीने काढलेला असेल तर ; किंवा

(ख) अशा व्यक्तीने दाखल केलेल्या अपिलाच्या संबंधात किंवा केलेल्या प्रतिवेदनाच्या संबंधात, शासनाने किंवा असा आदेश संमत करण्यास सक्षम अशा अन्य प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने किंवा अन्य व्यक्तीने, अंतिम आदेश काढलेला नसेल तेव्हा, असे अपील दाखल करण्यात आल्याच्या किंवा प्रतिवेदन करण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त झाला असेल तर.

(३) पोटकलमे (१) व (२) च्या प्रयोजनार्थ, अर्जदाराला, राष्ट्रपतीकडे किंवा राज्याच्या राज्यपालाकडे किंवा अन्य कोणत्याही कार्यकारी अधिकाऱ्याकडे विज्ञापन सादर करण्याची जी मुभा आहे त्याद्वारे त्याला उपलब्ध असलेली उपाययोजना ही, त्या अर्जदाराने, असे विज्ञापन सादर करण्याचा पर्याय स्वतः होऊन निवडलेला नसेल तर, त्याला उपलब्ध असलेल्या उपाययोजनांपैकीच एक आहे, असे मानण्यात येणार नाही.

**मर्यादा.**

२१. (१) न्यायाधिकरण पुढील बाबतीत अर्ज दाखल करून घेणार नाही,—

(क) गाऱ्हाण्यांच्या संबंधात कलम २० पोटकलम (२) खंड (क) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणेचा अंतिम आदेश काढण्यात आला असेल त्या बाबतीत असा अंतिम आदेश काढण्यात आल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत अर्ज करण्यात आला नसेल त्या प्रकरणी ;

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम १४ द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या, कलम १४ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

(ख) कलम २० पोटकलम (२), खंड (ख) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे अपील किंवा प्रतिवेदन सादर करण्यात आलेले असेल आणि त्यानंतर, सहा महिन्यांचा कालावधी समाप्त झालेला असेल व असा सहा महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत कोणताही अंतिम आदेश काढण्यात आलेला नसेल, अशा प्रकरणी.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा,—

(क) ज्यांच्या बाबतीत अर्ज करण्यात आलेला असेल, असे गाऱ्हाणे, ज्या दिनाकांस न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार हे, एखादा आदेश ज्याच्या संबंधात असेल अशा विषयाच्या बाबतीत या अधिनियमान्वये, वापरण्यायोग्य होत असतील, त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षांच्या कालावधीत कोणत्याही वेळी काढलेल्या त्या आदेशामुळे उद्‌भवलेले असेल, तेव्हा ; आणि

(ख) उक्त दिनांकापूर्वी कोणत्याही उच्च न्यायालयात असे गाऱ्हाणे दूर करण्याकरिता कोणतीही कार्यवाही सुरू करण्यात आलेली नसेल, तेव्हा,

तो अर्ज, जर पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये किंवा, यथास्थिति, खंड (ख) मध्ये निर्देशिलेला कालावधी किंवा उक्त दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी, यांपैकी जो नंतर समाप्त होईल, अशा कालावधीत करण्यात आला असेल तर, न्यायाधिकरण तो अर्ज विचारात घेईल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अर्जदाराने जर न्यायाधिकरणाची अशी खात्री पटवून दिली की, अशा मुदतीत अर्ज न करण्यास त्याला पुरेसे कारण होते तर, पोटकलम (१), च्या खंड (क) किंवा खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेला एक वर्षाचा कालावधी किंवा, यथास्थिति, पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेला सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतरही असा अर्ज दाखल करता येईल.

२२. (१) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) मध्ये ठरवून दिलेली कार्यपद्धती न्यायाधिकरणावर बंधनकारक नसेल, परंतु, नैसर्गिक न्यायाची तत्त्वे न्यायाधिकरणाला मार्गदर्शक ठरतील आणि या अधिनियमाच्या व त्याखाली केंद्र सरकारने केलेल्या कोणत्याही नियमांच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने न्यायाधिकरणाला आपल्या चौकशीचे ठिकाण व वेळ निश्चित करण्याचा व चौकशी सार्वजनिक करावी की खाजगी रीत्या करावी, हे ठरवण्याच्या कार्यपद्धतीसह आपली स्वतःची कार्यपद्धती नियमित करण्याचा अधिकार असेल. न्यायाधिकरणाची कार्यपद्धती त्याचे अधिकार.

(२) न्यायाधिकरण, त्याच्याकडे करण्यात आलेल्या प्रत्येक अर्जावर शक्य तितक्या तातडीने निर्णय घेईल आणि सर्वसाधारणतः प्रत्येक अर्जाबाबतचा निर्णय हा, दस्तऐवजांचे व लेखी निवेदनांचे अवलोकन केल्यावर आणि न्यायाधिकरणाने, [१][सादर करण्यात आलेला मौखिक युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर] केला जाईल.

(३) न्यायाधिकरणाला, [१][या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडण्याच्या] प्रयोजनार्थ, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये पुढील बाबींसंबंधात खटल्याची सुनावणी करण्याकरिता दिवाणी न्यायालयांकडे निहित असतील असे अधिकार असतील—

(क) एखाद्या व्यक्तीला हजर राहण्यास फर्मावणे व भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवज शोधण्यास व सादर करण्यास भाग पाडणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे ;

(घ) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) याची कलमे १२३ व १२४ याच्या तरतुदींच्या अधीनतेने एखादा सार्वजनिक अभिलेख किंवा दस्तऐवज किंवा अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची प्रत कोणत्याही कार्यालयाकडून मागवणे ;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी राजादेश काढणे ;

(च) आपल्या निर्णयांचा फेरविचार करणे;

(छ) कसूर झाल्यामुळे प्रतिवेदन फेटाळणे किंवा त्यावर एकपक्षी निर्णय घेणे ;

(ज) कसूर झाल्याने एखादे प्रतिवेदन फेटाळण्याचा कोणताही आदेश किंवा त्याने एकपक्षी दिलेला कोणताही आदेश बाजूला सारणे; आणि

(झ) केंद्र सरकार विहित करील अशी अन्य कोणतीही बाब.

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम १५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

**सादरकर्ता अधिकारी नियुक्त करण्यासाठी विधिव्यवसायीचे व शासन, इत्यादींचे सहाय्य घेण्याचा अर्जदाराचा अधिकार.**

२३. (१) या अधिनियमान्वये एखाद्या न्यायाधिकरणाकडे अर्ज करणाऱ्या व्यक्तीने आपले म्हणणे न्यायाधिकरणासमोर मांडण्यासाठी एकतर जातीने उपस्थित राहावे किंवा तिच्या पसंतीच्या एखाद्या विधिव्यवसायीची मदत घ्यावी.

(२) केंद्र सरकारला किंवा राज्य शासनाला किंवा कलम १४ चे पोटकलम (३) किंवा कलम १५ चे पोटकलम (३) यांच्या तरतुदी ज्यांना लागू होतात अशा स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाला किंवा निगमाला [१][किंवा सोसायटील] [२][सादरकर्ता अधिकारी म्हणून एका किंवा अनेक विधिव्यवसायींना किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांना प्राधिकृत करता येईल आणि अशारीतीने प्राधिकृत करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, कोणत्याही अर्जाबाबतचे त्यांचे म्हणणे न्यायाधिकरणासमोर मांडील].

**अंतरिम आदेश काढण्यासंबंधीच्या शर्ती.**

२४. या अधिनियमाच्या इतर तरतुदींमध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या अर्जावर किंवा त्या अर्जाशी संबंधित अशा कोणत्याही कार्यवाहीमध्ये कोणताही अंतरिम आदेश (मग तो व्यादेशाच्या किंवा स्थगितीच्या स्वरुपातील असो किंवा अन्य कोणत्याही स्वरुपातील असो)—

(क) अशा अर्जाच्या व सर्व दस्तऐवजांच्या प्रती, अशा अंतरिम आदेशाच्या पुष्टचर्थ, ज्याच्या विरुद्ध असा अर्ज करण्यात आला असेल किंवा करण्याचे प्रस्तावित केले असेल, अशा पक्षाला पुरविण्यात आल्याशिवाय; आणि

(ख) प्रस्तुत प्रकरणात आपले म्हणणे मांडण्याची संधी अशा पक्षाला देण्यात आल्याशिवाय, काढण्यात येणार नाही :

परंतु, न्यायाधिकरणाची जर अशी खात्री पटली की, जी पैशाच्या रुपात पूर्णतः भरुन निघणे शक्य नाही, अशा प्रकारची अर्जदाराची होणारी हानी टाळण्याकरिता तसे करणे आवश्यक आहे तर, ते न्यायाधिकरण, खंड (क) व (ख) च्या आवश्यक अटी टाळून, अपवादात्मक उपाययोजना म्हणून अंतरिम आदेश काढू शकेल व त्याची कारणे लेखी नमूद करील, परंतु, असा अंतरिम आदेश हा, लगेचच तो विलोपित झाला नाही तर, तो केल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांचा कालावधी संपण्यापूर्वी उक्त आवश्यक अटी पूर्ण करण्यात आलेल्या नसल्यास, व न्यायाधिकरणाने अंतरिम आदेशाची अंमलबजावणी चालू ठेवलेली नसल्यास, उक्त कालावधी समाप्त झाल्यावर, परिणामक असण्याचे बंद होईल.

**[३][एका न्यायपीठाकडून दुसऱ्या न्यायपीठाकडे प्रकरणे हस्तांतरित करण्याचा अध्यक्षाचा अधिकार.**

२५. अध्यक्ष, कोणत्याही पक्षकाराकडून अर्ज आल्यास व पक्षकारांना नोटीस दिल्यानंतर आणि ज्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची त्यास इच्छा असेल, अशांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर किंवा अशी नोटीस न देता स्वतःहून एका न्यायपीठासमोर प्रलंबित असलेले कोणतेही प्रकरण, निकालात काढण्यासाठी, अन्य कोणत्याही न्यायपीठाकडे हस्तांतरित करु शकेल.

**बहुमताने निर्णय घेणे.**

२६. न्यायपीठाच्या सदस्यांची कोणत्याही मुद्यावर मतभिन्नता असेल तर, त्या मुद्याचा निर्णय जर, बहुमत असेल तर, बहुमतानुसार घेतला जाईल, परंतु जर सदस्यांची मते समसमान विभागली गेली असतील तर ज्या मुद्यावर किंवा मुद्यांवर त्यांच्यात मतभेद असतील तो मुद्दा वा मुद्दे ते कथन करतील आणि ते अध्यक्षाकडे निर्देशित करतील आणि अध्यक्ष असा मुद्दा किंवा मुद्दे यांची, एकतर स्वतः सुनावणी करील किंवा न्यायाधिकरणाच्या एक किंवा अनेक अन्य सदस्यांकडे ते सुनावणीसाठी निर्देशित करील आणि जे सदस्य त्या प्रकरणाची सुनावणी करतील त्यात, यापूर्वी न्यायाधिकरणाच्या ज्या सदस्यांनी त्या प्रकरणाची सुनावणी केलेली असेल त्यांचाही अंतर्भाव असेल,—त्यांच्यापैकी बहुमताने अशा मुद्यावर किंवा मुद्यांवर निर्णय घेतला जाईल.]

**न्यायाधिकरणाच्या आदेशाचे कार्यान्वयन.**

२७. या अधिनियमाच्या व नियमांच्या अन्य तरतुदींच्या अधीनतेने,—

[४][अर्ज किंवा अपील अंतिमरीत्या निकालात काढण्यास न्यायाधिकरणाचा आदेश अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात (तसेच उच्च न्यायालयातही) तो प्रश्नास्पद करता येणार नाही आणि असा आदेश,] तो अर्ज, ज्या गाऱ्हाण्याशी संबंधित असेल त्या गाऱ्हाण्यासंबंधात, कलम २०, पोटकलम (२) खंड (क) मध्ये निर्देशिलेल्या स्वरुपाचा कोणताही अंतिम आदेश ज्या पद्धतीने कार्यान्वित केला गेला असता, (मग असा अंतिम आदेश प्रत्यक्षात काढलेला असो वा नसो) त्याच पद्धतीने कार्यान्वित केला जाईल.

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम १६ द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून.)

३. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे मूळ कलमे २५ व २६ याऐवजी ही कलमे दाखल करण्यात आली (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण पाच

### संकीर्ण

२८. ज्या दिनांकास व दिनांकापासून न्यायाधिकरणाकडून या अधिनियमाखालील कोणतीही अधिकारिता, अधिकार व प्राधिकार हे, कोणत्याही सेवेत किंवा पदावर सेवाभरती करणाऱ्या संदर्भात व सेवाभरतीशी संबंधित बाबींच्या संदर्भात किंवा कोणत्याही दिनांकास सेवेतील सदस्यांच्या किंवा कोणत्याही सेवेत किंवा पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या संबंधात भरतीच्या किंवा सेवाविषयक बाबींच्या संदर्भात, वापरण्यायोग्य होतील, त्या दिनांकास व तेव्हापासून,— **सर्वोच्च न्यायालयाव्यतिरिक्त इतर न्यायालयांची अधिकारिता वगळणे.**

[1][ (क) सर्वोच्च न्यायालय ; किंवा

(ख) कोणतेही औद्योगिक न्यायाधिकरण, कामगार न्यायालय, किंवा औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) या खाली किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही तत्सम कायद्यान्वये ] अशा सेवाभरतीच्या संबंधात किंवा अशा सेवाभरतीशी संबंधित बाबींच्या संबंधात किंवा अशा सेवाविषयक बाबींच्या संबंधात कोणतीही अधिकारिता, अधिकार किंवा प्राधिकार असणार नाहीत किंवा त्यांचा वापर करण्याचा हक्क असणार नाही.

२९. (१) या अधिनियमान्वये न्यायाधिकरणाची स्थापना केल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी कोणत्याही न्यायालयासमोर किंवा अन्य प्राधिकरणासमोर प्रलंबित असलेला प्रत्येक दावा किंवा अन्य कार्यवाही, ही जर अशा प्रकारचा दावा किंवा अन्य कार्यवाही असेल की, ती ज्या वादकारणावर आधारलेली आहे, ते कारण जर अशा स्थापनेनंतर उद्‌भवले असते, तर ते अशा न्यायाधिकरणाच्या अधिकारितेत आले असते, तर तो दावा किंवा कार्यवाही त्या दिनांकास अशा न्यायाधिकरणाकडे हस्तांतरित झालेली असेल : **प्रलंबित प्रकरणांचे हस्तांतरण.**

परंतु, या पोट-कलमामधील कोणतीही गोष्ट, उच्च न्यायालयासमोर [2][ * * * * ] उपरोक्त प्रमाणे प्रलंबित असलेल्या कोणत्याही अपिलाला लागू होणार नाही.

(२) एखाद्या न्यायाधिकरणाला, कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या बाबतीतील किंवा महामंडळाच्या [3][किंवा सोसायटीच्या] बाबतीतील अधिकारिता ज्या दिनांकापासून प्रदान करण्यात आलेली असेल, त्या दिनांकाच्या लगतपूर्वी, एखाद्या न्यायालयासमोर किंवा अन्य प्राधिकरणासमोर प्रलंबित असलेला प्रत्येक दावा किंवा कार्यवाही ही अशा प्रकारची असेल की, ती ज्या वादकारणावर आधारित आहे ते कारण उक्त दिनांकानंतर उद्‌भवले असते तर अशा न्यायाधिकरणाच्या अधिकारितेत आले असते, तर तो दावा किंवा कार्यवाही त्या दिनांकास अशा न्यायाधिकरणाकडे हस्तांतरित झालेली असेल :

परंतु, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट उच्च न्यायालयासमोर [2][ * * * *] उपरोक्त-पणे प्रलंबित असलेल्या कोणत्याही अपिलास लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "एखाद्या न्यायाधिकरणाला अधिकारिता ज्या दिनांका-पासून प्रदान करण्यात आलेली असेल तो दिनांक" याचा, कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या किंवा निगमाच्या [3][किंवा सोसायटीच्या] संदर्भातील अर्थ, "कलम १४, पोटकलम (३) च्या तरतुदी किंवा यथास्थिति, कलम १५, पोटकलम (३) च्या तरतुदी अशा स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाला किंवा निगमाला [3][किंवा सोसायटीला], ज्या दिनांकापासून लागू करण्यात आलेले असतील तो दिनांक" असा आहे.

(३) जेव्हा, एखाद्या संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणांच्या स्थापनेच्या दिनांकाच्या लगतपूर्वी, ते न्यायाधिकरण ज्या एका किंवा अनेक राज्यांसाठी स्थापन करण्यात आलेले असेल त्या राज्यासाठी किंवा राज्यांसाठी, राज्य न्यायाधिकरण किंवा राज्य न्यायाधिकरणे असतील, तेव्हा, अशा राज्य न्यायाधिकरणा-समोर किंवा राज्य न्यायाधिकरणांसमोर उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे त्यांच्या अभिलेखांसह, अशा संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे, त्या दिनांकास हस्तांतरित झालेली असतील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "राज्य न्यायाधिकरण" याचा अर्थ, कलम ४, पोट-कलम (२) अन्वये स्थापन केलेले न्यायाधिकरण, असा आहे.

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम १९ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे "किंवा सर्वोच्च न्यायालयासमोर" हे शब्द वगळण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे हे शब्द जादा दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

(४) जेव्हा कोणत्याही न्यायालयाकडून किंवा अन्य प्राधिकरणाकडून एखाद्या न्यायाधिकरणाकडे, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये, कोणताही दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही हस्तांतरित झालेली असेल तेव्हा,—

(क) अशा हस्तांतरणानंतर शक्य तेवढ्या लवकर, ते न्यायालय किंवा अन्य प्राधिकरण अशा दाव्याचे, अपिलाचे किंवा अन्य कार्यवाहीचे अभिलेख या न्यायाधिकरणाकडे पाठवील ; आणि

(ख) असे अभिलेख मिळाल्यानंतर, न्यायाधिकरणास, कलम १९ खालील अर्जाच्या प्रकरणात ज्यारीतीने कार्यवाही केली जाते त्याच रीतीने अशा दाव्याबाबत, अपिलाबाबत किंवा अन्य कार्यवाहीबाबत अशा हस्तांतरणाच्या पूर्वी ज्या टप्प्यापर्यंत कार्यवाही झालेली असेल त्या टप्प्यापासून, किंवा न्यायाधिकरणास योग्य वाटेल अशा आधीच्या टप्प्यापासून, किंवा नव्याने, कार्यवाही सुरू करता येईल.

(५) जेव्हा कोणतेही प्रकरण, पोटकलम (३) अन्वये, संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे हस्तांतरित झालेले असेल तेव्हा, संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरण, अशा रीतीने ते प्रकरण हस्तांतरित होण्यापूर्वी ज्या टप्प्यापर्यंत पोहोचलेले असेल त्या टप्प्यापासून त्यावर पुढे कार्यवाही सुरू करू शकेल.

[1][ (६) प्रशासकीय न्यायाधिकरण (विशोधन) अधिनियम, १९८७ (१९८७ चा ५१) याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी न्यायाधिकरणासमोर प्रलंबित असलेले प्रत्येक प्रकरण, हे जर अशा प्रकारचे प्रकरण असेल की, ते ज्या वादकारणावर आधारलेले आहे ते वादकारण अशा प्रारंभानंतर उद्भवले असते तर ते एखाद्या न्यायालयाच्या अधिकारितेत आले असते, तर ते प्रकरण त्याच्या अभिलेखांसह, अशा न्यायालयाकडे अशा प्रारंभास हस्तांतरित झालेले असेल.

(७) पोटकलम (६) अन्वये एखाद्या न्यायालयाकडे कोणतेही प्रकरण हस्तांतरित करण्यात आले असेल याबाबतीत ते न्यायालय, असे प्रकरण हस्तांतरित होण्यापूर्वी ज्या टप्प्यापर्यंत पोहोचलेले असेल त्या टप्प्यापासून त्यावर पुढील कार्यवाही सुरू करू शकेल.]

**विवक्षीत अपिले दाखल करण्याकरिता तरतूद.** [2][२९क. जेव्हा, न्यायाधिकरणाच्या स्थापनेपूर्वी (उच्च न्यायालयाहून अन्य) अशा कोणत्याही न्यायालयाने कोणताही हुकूमनामा किंवा आदेश अशा एखाद्या दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या संबंधात दिला असेल किंवा पारित केला असेल की, तो दावा किंवा कार्यवाही ज्या वादकारणावर आधारलेली असेल, ते कारण जर अशा स्थापनेनंतर उद्भवले असते तर ते न्यायाधिकरणाच्या अधिकारितेत आले असते आणि अशा हुकूमनाम्याविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील अशा स्थापनेपूर्वी करण्यात आलेले नसेल आणि त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याद्वारे, असे अपील करण्याचा कालावधी अशा स्थापनेपूर्वी समाप्त झालेला नसेल, तेव्हा असे अपील,—

(क) प्रशासकीय न्यायाधिकरण (विशोधन) विधेयक, १९८६ यास राष्ट्रपतीची अनुमती मिळण्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत किंवा अशा हुकूमनाम्याची किंवा आदेशाची एक प्रत केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणास मिळाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, यापैकी जे नंतर घडेल तोपर्यंत, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे; किंवा

(ख) अन्य कोणत्याही न्यायाधिकरणाकडे, त्याच्या स्थापनेपासून नव्वद दिवसांच्या आत किंवा अशा हुकूमनाम्याची किंवा आदेशाची प्रत मिळण्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, यांपैकी जे नंतर घडेल तोपर्यंत,

दाखल करता येईल.]

**न्यायाधिकरणासमोरील कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असणे.** ३०. एखादया न्यायाधिकरणासमोरील सर्व कार्यवाही, ही भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थांतर्गत, न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

**न्यायाधिकरणांचे सदस्य व कर्मचारी हे लोकसेवक असणे.** ३१. कलम १३ अन्वये न्यायाधिकरणाला पुरवण्यात आलेले, अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य आणि अधिकारी व कर्मचारी हे, भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.** ३२. या अधिनियमास किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमास किंवा आदेशास अनुलक्षून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीबाबत, केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांच्याविरुद्ध किंवा कोणत्याही केंद्र किंवा संयुक्त किंवा राज्य प्रशासकीय न्यायाधिकरणाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांच्याविरुद्ध किंवा अशा अध्यक्षाने, उपाध्यक्षाने, किंवा अन्य सदस्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अन्य व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

---

१. १९८७ चा अधिनियम ५१, कलम ५ द्वारे पोट-कलम (५) नंतर ही पोटकलमे दाखल करण्यात आली (२२ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९८६ चा अधिनियम १९, कलम २१ द्वारे कलम २९ नंतर हे कलम दाखल करण्यात आले (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३३. या अधिनियमाच्या तरतुदी, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे प्रभावी असणाऱ्या कोणत्याही संलेखात, त्यांच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असेल तरी, प्रभावी होतील. अधिनियमाचा परिणाम अधिभावी असणे.

३४. (१) या अधिनियमाच्या तरतुदी, अंमलात आणतांना कोणतीही अडचण उद्भवल्यास, केंद्र सरकार, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशान्वये ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करू शकेल. अडचणी दूर करण्याचे अधिकार.

(२) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक आदेश हा, तो करण्यात आल्यावर शक्य तेवढ्या लवकर, संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात येईल.

३५. (१) केंद्र सरकार या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी कलम ३६ च्या तरतुदींच्या अधीनतेने, अधिसूचनेद्वारे, नियम करू शकेल. नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

(२) पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाधा न पोचवता अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टीसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ५ पोटकलम (४), खंड (घ) अन्वये [1][दोनपेक्षा] अधिक [1][सदस्य] मिळून बनलेल्या न्यायापीठाकडून निर्णय दिला जाईल असे प्रकरण किंवा प्रकरणे ;

(ख) अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांच्या गैरवर्तणुकीचे किंवा अकार्यक्षमतेचे अन्वेषण करण्यासाठी, कलम ९, पोटकलम (३) खालील कार्यपद्धती ;

(ग) अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या इतर अटी व शर्ती ;

(घ) कलम १९ खालील अर्ज ज्या नमुन्यात करता येईल तो नमुना त्या अर्जासोबत सादर करावयाचे दस्तऐवज व इतर पुरावा [2][आणि असा अर्ज दाखल करण्यासंबंधात किंवा आदेशिकेची बजावणी किंवा निष्पादन याकरिता देय असणारी फी] ;

(ङ) ज्या नियमांना अधीन राहून न्यायाधिकरणाला कलम २२, पोटकलम (१) खालील आपल्या कार्यपद्धतीचे नियमन करण्याचे अधिकार असेल ते नियम आणि ज्या अतिरिक्त बाबींसंबंधात न्यायाधिकरणाला त्या कलमाच्या पोटकलम (३), खंड (झ) अन्वये दिवाणी न्यायालयाच्या अधिकारांचा वापर करता येईल, त्या बाबी; आणि

(च) ज्या कोणत्याही इतर बाबी केंद्र सरकारकडून विहित करण्यात येतील किंवा ज्यांच्या बाबतीत केंद्र सरकारकडून नियम करण्याची आवश्यकता असेल अशा बाबी.

३६. समुचित शासन, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता तरतूद करण्यासाठी, अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल :— समुचित शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

(क) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, न्यायाधिकरणाच्या [3][ * * * ] न्यायपीठाबाबत ज्यांचा वापर करू शकेल अशा कलम १२ खालील वित्तीय व प्रशासकीय अधिकार;

(ख) न्यायाधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांचे कलम १३, पोटकलम (२) खालील वेतन व भत्ते आणि इतर सेवेच्या शर्ती ; आणि

(ग) कलम ३५ मध्ये विनिर्दिष्ट केली नसेल अशा ज्या कोणत्याही बाबींसंबंधात समुचित शासनाने नियम करणे आवश्यक असेल अशी कोणतीही अन्य बाब.

३६क. कलम ३५ चे पोटकलम (२) चा खंड (ग) किंवा कलम ३६ चा खंड (ख) अन्वये नियम [4][करण्याच्या अधिकारामध्ये, या अधिनियमास राष्ट्रपतीची अनुमती मिळण्याच्या दिनांकाच्या अगोदरचा नसेल अशा दिनांकापासून भूतलक्षी स्वरूपात असे नियम किंवा त्यांच्यापैकी कोणताही नियम करण्याचा अधिकार अंतर्भूत असेल ; परंतु असे नियम ज्या कोणत्याही व्यक्तींना लागू होऊ शकतील, त्या व्यक्तींच्या हिताला बाधा पोचेल अशा रीतीने अशा कोणत्याही नियमाला भूतलक्षी प्रभाव देण्यात येणार नाही.] भूतलक्षी प्रभावाने नियम करण्याचा अधिकार.

---

१. १९८६ चा अधिनियम १९, कलम २२ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२२ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या, कलम २२ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२५ जानेवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २३ द्वारे "प्रधान न्यायपीठ व अतिरिक्त" हा मजकूर वगळण्यात आला (२२ जानवारी, १९८६ रोजी व तेव्हापासून).

४. १९८७ चा अधिनियम ५१, कलम ६ द्वारे कलम ३६ नंतर हे कलम दाखल करण्यात आले (२२ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

नियम मांडणे. ३७. (१) केंद्र सरकार या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यावर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, त्याचे अधिवेशन चालू असताना, एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता मांडण्यात येईल, आणि जर उपरोक्त सत्राच्या किंवा लागोपाठच्या सत्राच्या लगत नंतरचे सत्र समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात काही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, या नियमान्वये तत्पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(२) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यावर शक्य तेवढ्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर मांडण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई